# यावल महाविद्यालयात भूगोल दिन साजरा





त्रयांचा पाळले. आहे. आतापर्यंत मंडळातर्फे ६० होत्या.

## यावल महाविद्यालयात भूगोल दिनानिमित्त व्याख्यान

देशोन्नती वृत्तसंकलन...

**यावल** ■ येथील महाविद्यालयात 'भूगोल दिन' निमित्ताने व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमात प्रमुख वक्ता म्हणून शासकीय अध्यापक महाविद्यालय, नांदेड येथील डॉ. वैजनाथ गंदगे उपस्थित होते तर अध्यक्षस्थान उपप्राचार्य प्रा.एम.डी.खैरनार यांनी भूषविले.

भूगोल विषय आजच्या काळात महत्त्वाचा आहे हे समजून घेण्यासाठी भूगोल दिनाचे आयोजन भूगोल विभागामार्फत करण्यात आले होते. डॉ. वैजनाथ गंदगे यांनी भूगोल दिनाचे महत्त्व सांगून भूगोल दिन का साजरा करतो. भूगोल विषयाचा इतर विषयाची असणारा संबंध याविषयी मार्गदर्शन केले. प्रा.एम.डी.खैरनार यांनी अध्यक्षीय भाषणात प्रतिपादन केले की भूगोल विषय हा किती महत्त्वाचा आहे. भूगोल आणि मकरसंक्रांत याविषयी महत्त्व सांगितले. प्राचार्य डॉ. संध्या सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भूगोल विभाग प्रमुख नरेंद्र पाटील यांनी तर आभार सुभाष कामडी यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रा.ए.पी. पाटील, प्रा.संजय पाटील, डॉ. सुधीर कापडे, डॉ. प्रल्हाद पावरा, प्रा.दिलीप मोरे, प्रा. एस. आर.गायकवाड यांनी सहकार्य केले. सदर कार्यक्रमास सर्व शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

ePaper देशोन्नती
Fri, 21 January 2022
https://deshonnati.digitaledition.in/c/65729673